# धडपड

जन्मापासून प्रत्येकजण धडपड करीत असतो. चांगल्याप्रकारे जगता यावं हा उद्देश ! आणि ही धडपड त्याच्या अंतापर्यंत तशीच चालते. वय, काळ, परिस्थिती, कारणं वेगवेगळी असू शकतात. थोडक्यात काय निरोगी, निरामय, आनंदी आणि भरपूर वर्षं आयुष्य उपभोगता यावं असा प्रत्येकाचा प्रयत्न असतो. असं असलं तरीही प्रत्येक गोष्टीला शेवटी मर्यादा ही आहेच.

तस पाहिलं तर आनंद, सुख, समाधान हे आपल्या मानण्यावर असतं. ते कुठे विकत मिळत नाही. आपणच तयार करायचं आणि जमलं तर इतरांनाही द्यायचं! पण असं होत नाही. आणि झालंच तर ते ही क्वचितच ! कारण आयुष्याचा वेग आणि आपल्या सुखासमाधानाच्या व्याख्या यांचा मेळ घालताघालता आयुष्य केव्हा संपतं कळतच नाही. बरेचदा आपली इच्छा अपूर्ण राहते. ह्यातूनही काहीजण वेगाने पुढे जातातही. यशस्वी होतातही. पण — सर्वांनाच ते जमणं अवघड !

आपल्या आशाआकांक्षांचा वेग हा आपल्या कर्तृत्वापेक्षा जास्त असल्याने हे घडतं. असं मला वाटतं. पण त्यामुळे "धडपड" थांबत नाही. त्याला आपण प्रगती म्हणतो. जिंकणं तेही आवश्यकच ! प्रगतीचा हा रथ काही काळपर्यंत शर्यतीत धावतो व थकून आराम करतो. हेच तर जीवन आहे खरं. कारण थांबला तो संपला हा सृष्टीचा नियमच आहे. त्यामुळे या शर्यतीत किती धावायचं हे ज्याचं त्यानं ठरवायचं.

सौ. उज्वला प्रभुणे
वृन्दावन हाईट्स
कोथरूड, पुणे